[वेळ: ३ तास] [ गुण:१००]

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१** अ) मानवी भाषेची लक्षणे सविस्तर विशद करा. २०

किंवा

आ) रोमान याकोबसन यांनी सांगितलेल्या भाषिक कार्यांचे सविस्तर विवेचन करा.

**प्र.२** अ) भाषा, समाज आणि संस्कृती यांतील परस्परसंबंधाची चर्चा करा. २०

किंवा

आ) भाषिक ऱ्हासाची कारणे सांगून भाषा ऱ्हासाच्या विविध अवस्था लिहा.

**प्र.३** अ) बोली म्हणजे काय ते सांगून बोलींविषयीच्या विविध गैरसमजांची चर्चा करा. २०

किंवा

आ) बोलींच्या सामाजिक व सांस्कृतिक अभ्यासाचे महत्त्व थोडक्यात लिहा.

**प्र.४** खालीलपैकी प्रत्येक गटांतील प्रत्येकी एक टीप लिहा. ३०

‘अ’ गट- १. मानवाचे भाषेतर संप्रेषण
२. संदेशन-भाषेचे एक कार्य

‘ब’ गट- १. भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत
२. भाषाविकासाची संकल्पना

‘क’ गट- १. मराठीच्या विविध बोली
२. बोलींसमोरील आव्हाने

**प्र.५** खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१. मानवी भाषेची कोणतेही एक व्याख्या लिहा.
२. मानवी भाषेचे दोन स्तर कोणते?
३. मानवी भाषेची कोणतेही दोन कार्ये लिहा.
४. भाषेचा बहुजिनसीपणा म्हणजे काय?
५. भाषिक ध्रुवीकरणाचे कोणतेही दोन धोके लिहा.
६. भाषानियोजन म्हणजे काय?
७. प्रमाणभाषा म्हणजे काय?
८. अहिराणी बोली कोणत्या जिल्ह्यांमध्ये बोलली जाते?
९. बोलीवैविध्याचे कोणतेही दोन प्रकार लिहा.

*****************